॥ परिकथेतिल राजकुमारा ॥

गायिकाः कृष्णा कल्ले
गीतः वन्दना विटणकर
संगीतः अनिल मोहिले

परिकथेतिल राजकुमारा स्वप्नीं माझ्या येंशिल का?
भाव दाटले मनी अनामिक साद तयांना देशिल का? ॥ धृ. ॥

या डोळ्यांचे गूढ इषारे
शब्दावाचुन जाणुन सारे
राणी अपुली मला म्हणोनी तुझियासंगे नेशिल का? ॥ १ ॥

मूर्त मनोरम मनीं रेखिली
दिवसा रात्रीं नित्य देखिली
त्या रूपाची साक्ष जिवाला प्रत्यक्षांतुन देशिल का? ॥ २ ॥

लांजुन डोळे लवविन खाली
नवख्या गाली येइल लाली
फुलापरी ही तनू कापरी हृदयापाशी घेशिल का? ॥ ३ ॥

लाजबावरी मिटुन पापणी
सांठवीन तें चित्र लोचनीं
नवरंगी त्या चित्रामधले स्वप्नच माझे होशिल का? ॥ ४ ॥